दै. संध्यानंद, पुणे • शुक्रवार २६ नोव्हें



# आयुष्य हवे तर आरोग्य हवे !



# डॉक्टरांनी समाजाभिमुख होऊन काम करण्याची गरज : डॉ.



डॉ. अमर निकम

**होमिओपॅथीच्या प्रसारार्थ भारतात भरीव कार्य केल्याबद्दल पिंपरी येथील डॉ. अमर निकम यांना विविध पारितोषिके मिळाली आहेत. देशातील पहिले खासगी होमिओ रुग्णालय स्थापन केल्याचा त्यांचा दावा आहे. त्यांच्या कारकिर्दीचा आढावा घेतलेली मुलाखत.**

**• होमिओपॅथीविषयी भारतात तेव्हा अनुकूल वातावरण नव्हते, तेव्हा याच क्षेत्रात 'करिअर' करण्याचा विचार का केला ?**

**डॉ. निकम** - सुमारे २५ वर्षांपूर्वी विद्यार्थी म्हणून होमिओपॅथीशी माझा निकटचा संबंध आला. तेव्हा भारतात या चिकित्सापद्धतीच्या शिक्षणाची आणि सरावाची व्यवस्था विरळ होती. 'होमिओपॅथी' हा विषयच लोकांना नवीन होता. त्यामुळे याच क्षेत्रात काम करण्याची आव्हानात्मक संधी होती, हे लक्षात घेऊन मी २४ वर्षांपूर्वी 'प्रॅक्टीस' सुरू केली. अनेक प्रयासानंतर १९९४ मध्ये देशातील पहिलं होमिओ हॉस्पिटल मी सुरू केलं.

**• इतर चिकित्सापद्धतीच्या तुलनेत होमिओपॅथीचं वेगळेपण कोणतं आहे ?**

**डॉ. निकम** - समचिकित्सक पद्धत. ही अशी पद्धती आहे ज्यामध्ये रुग्णाच्या आरोग्याचा विचार केला जातो. उपचार करताना त्याच्या रोगाला फारसे महत्त्व दिले जात नाही. रुग्णाची शारीरिक आणि मानसिक अवस्था, त्याचा पूर्वेतिहास याची कसून माहिती सर्वप्रथम घेतली जाते. रोगनिदानात रोग्याच्या भवितव्याचा विचार केंद्रस्थानी ठेवला जातो. साध्य-असाध्य रोगांना पळवून लावण्याची क्षमता शरीरात निर्माण करण्याचे कार्य होमिओपॅथी औषधोपचाराचे खरे रहस्य आहे. साध्य रोगात औषधोपचारानंतर रुग्णाचे आयुर्मान वाढते. आजाराने निर्माण झालेली विशेष लक्षणे, संवेदनातील सूक्ष्म बदल, वातावरण, ऋतू, आहार यांच्या पार्श्वभूमीवर होमिओपॅथीची पद्धती कार्य करते.

**• 'करिअर' साठी या क्षेत्रात आजमितीला कितपत वाव आहे ?**

**डॉ. निकम** - होमिओपॅथीच्या प्रचार-प्रसारापासून ते शैक्षणिक आणि औषधे, उपचार आदींबाबत खूपच प्रगती झाली आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे हे क्षेत्र आता सुपरिचित झाले आहे. तिथेही स्पर्धा आणि संघर्ष, कष्ट, अभ्यास, प्रयोग करण्याला अनुकूल वातावरण आहे.

**• आपल्या कार्यांची दखल कोणी घेतली ?**

**डॉ. निकम** - दोन वर्षांपूर्वी लंडन न्यूज टाईममध्ये 'न्यूज मेकर' म्हणून मला प्रसिद्धी मिळाली. 'होम्योपॅथी -दी आर्ट रॅपिड अँड जनरल हीलिंग' हे पुस्तक मी लिहिले. इंटरनॅशनल गोल्ड-स्टार मिलेनियम अॅवॉर्ड, इंडियन टीम डॉक्टर अॅवॉर्ड, इंदिरा गांधी सद्भावना पुरस्कार, श्रीकृष्ण सेवा अॅवॉर्ड असे काही गौरव-पुरस्कार मला प्राप्त झालेत. गेल्या २४ वर्षांत मला ३० ते ४० हजार रुग्णांची सेवा करता आली.

**• व्यवसाय आणि सामाजिक ऋण यांची सांगड कशी घालता ?**

**डॉ. निकम** - यात्रा, मेळावे अशा सार्वजनिक कार्यक्रमांत मोफत सेवाशिबिरे मी गेली अनेक वर्षे घेतो. ठाण्याच्या आदिवासी, कुपोषितांसाठी, तसेच गणपतीपुळे, गगनबावडा, अंबरनाथ या भागांतही कार्यक्रम घेतले. शारीरिक आरोग्याबरोबरच सामाजिक आरोग्य राखण्याकामी असे संतुलन प्रत्येकाने, विशेषत: डॉक्टरी पेशाने तरी जोपासले पाहिजे. भूक लागली असेल, तेव्हा तेवढेच खाणे. पाऊणतास व्यायाम जोडीला केलाच पाहिजे. माझ्या विद्यार्थ्यांना मी नेहमी समाजाभिमुख डॉक्टर होण्याचे सांगत असतो.

पत्ता - डॉ. अमर निकम
आदित्य होमिओपॅथिक
हॉस्पिटल, पिंपरी, पुणे
फोन-(०२०) २७४१२५४१



हैदराबादच्या हॉटेल व्हाइसराय येथे १७ ... पडलेल्या समारंभात आंध्र प्रदेशचे राज्यपा... यांच्या हस्ते 'इंदिरा गांधी सद्भावना पुरस्कार ... आंध्र प्रदेशचे माजी राज्यपाल भीष्म सि... कौन्सिलचे जनरल सेक्रेटरी संजय सिंग इ. मा...